# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

---

**जळगाव दि. १० (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने दि. १८ ऑक्टोबर रोजी जिल्हास्तरीय अविष्कार संशोधन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे गेल्या दोन वर्षापासून ही संशोधन स्पर्धा होवू शकली नाही.**

विद्यार्थीदशेत संशोधनाची आवड निर्माण व्हावी यासाठी राज्यपालांनी दरवर्षी विद्यापीठ स्तरावर व त्यानंतर राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर अविष्कार संशोधन स्पर्धा सुरू केलेली आहे. विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने यंदा १८ ऑक्टोबर, २०२२ रोजी एकाच दिवशी जळगाव,धुळे व नंदुरबार या तिनही जिल्ह्यांसाठी त्या त्या जिल्ह्यात ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. त्यानंतर २० ऑक्टोबर रोजी विद्यापीठातील प्रशाळांसाठी ही संशोधन स्पर्धा होईल. जिल्हा स्तरावरील अविष्कार स्पर्धा झाल्यांनतर त्यातील विजेत्यांची स्पर्धा दि. ११ व १२ नोव्हेंबर, २०२२ रोजी होणार आहे.

या स्पर्धेत विषय निहाय सहा गट करण्यात आले आहेत. त्यामध्ये पहिल्या गटात सामाजिकशास्त्र, शिक्षण, भाषा, मानव्यविद्या, ललित कला, दुसऱ्या गटात वाणिज्य, व्यवस्थापन आणि विधी, तिसऱ्या गटात विज्ञान ज्यामध्ये भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जैवशास्त्र, गणित, पर्यावरणशास्त्र, गृह आणि संगणशास्त्र, चौथ्या गटात कृषि आणि पशुसंवर्धन, पाचव्या गटात. अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, व सहाव्या गटात औषधिनिर्माणशास्त्र यांचा समोवश आहे. ही स्पर्धा पदवी, पदव्युत्तर, पदव्युत्तरपदवी आणि शिक्षक या चार संवर्गात होणार आहे.

जिल्हा स्तरावर होणाऱ्या स्पर्धेचे संयोजकत्व स्विकारण्यासाठी महाविद्यालयांकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. १५ सप्टेंबर पर्यंत महाविद्यालयांनी हे प्रस्ताव सादर करावयाचे आहेत. या स्पर्धेसाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर अविष्कार – २०२२ या नावाने स्वतंत्र पोर्टल तयार करण्यात आले आहे. या पोर्टलवर स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी १० सप्टेंबर पासून लिंक उपलब्ध करून देण्यात आली आहे. ८ ऑक्टोबर पर्यंत विद्यार्थ्यांना नाव नोंदणी व शुल्क भरता येईल. अशी माहिती स्पर्धेचे समन्वयक व संगणकशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा. सतीष कोल्हे, पदार्थ विज्ञान विभागाप्रमुख प्रा. जयदीप साळी व विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक प्रा. सुनील कुलकर्णी यांनी केले आहे.

## बातमी नं. २

**जळगाव दि.१० (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा प्रशाळेतील हिंदी विभाग प्रमुख व विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक प्रा. सुनील कुलकर्णी हे १४ व १५ सप्टेंबर रोजी रशियाच्या मास्को येथील विद्यापीठात होणाऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेत शोधनिबंध सादर करणार आहेत.**

भारत व रशिया मैत्री संबंधांना ७५ वर्ष पूर्ण होत असल्याबद्दल रशियातील लोमोनोसोव मास्को स्टेट विद्यापीठ, रशिया स्टेट लायब्ररी, इन्स्टिटयुट ऑफ ओरिएन्टल स्टडीज, पुश्कीन रशियन भाषा संस्था, सेंट पीटर्सबर्ग विद्यापीठ, भारतीय सांस्कृतिक संबंध आणि मुंबई विद्यापीठातील साहित्यरत्न

...२

अण्णाभाऊ साठे अध्यासन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने १४ व १५ सप्टेंबर रोजी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य या विषयावर आंतरराष्ट्रीय चर्चासत्र होणार आहे. प्रा. सुनील कुलकर्णी हे 'राष्ट्रशिवशाहिर बाबासाहेब देशमुख यांच्या पोवाड्यातून अभिव्यक्त साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा जीवनसंघर्ष व विद्रोही विचार' या विषयावर शोधनिबंध सादर करणार आहेत. या चर्चासत्राच्या उद्घाटनास केंद्रीय राज्यमंत्री नारायण स्वामी, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभेचे सभापती अॅड. राहुल नार्वेकर, भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेचे डॉ. विनय सहस्त्र बुध्दे आदि उपस्थित राहणार असून या चर्चासत्राचे औचित्य साधून मास्को शहरात उभारण्यात आलेल्या अण्णाभाऊ साठे यांच्या पुर्णाकृती पुतळयाचे अनावरण होणार आहे. प्रा. सुनील कुलकर्णी यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात आले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक: १० सप्टेंबर, २०२२

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय देनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी